

# ज्ञान प्रबोधिनी

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. विनायक विश्वनाथ तथा आप्पाजी पेंडसे एक शिक्षणतज्ज्ञ, समाजसंघटक आणि कृतिशील विचारवंत होते. स्वामी विवेकानंद हे त्यांचे प्रेरणास्थान! ‘आपल्या देशाची अस्मिता व एकात्मता ज्यातून व्यक्त होते अशा सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन तसेच दारिद्र्यनिर्मूलन, दुःखनिवारण यासाठी करावयाचे प्रबोधन आणि संघटन’ यांची सांगड स्वामी विवेकानंदांनी घालण्याचा प्रयत्न केला. मनुष्यघडणीच्या शिक्षणाचा विचार त्यांनी मांडला. त्या विचारातून देश-विदेशात अनेक कार्ये उभी राहिलेली आहेत. ज्ञान प्रबोधिनी हा त्यातीलच एक स्वायत्त आविष्कार!!

मोठी स्वप्ने साकार करण्यासाठी आत्मनिर्भर बुद्धिमत्तेची आवश्यकता असते, ही गोष्ट स्वतः मानसतज्ज्ञ असलेल्या कै. आप्पांनी हेरली होती. स्वतंत्र भारतासमोरील विविध प्रश्न सोडवण्यासाठी ज्यांचे बौद्धिक, शारीरिक आणि आत्मिक विकसन होऊन एकसंध असे व्यक्तिमत्त्व आकारास आले आहे, असे युवक-युवती समाजाला हवेत, असे त्यांच्या लक्षात आले. ‘रूप पालटू देशाचे’ या ध्येयासाठी त्यांनी मार्ग निवडला नेतृत्वशिक्षण आणि नेतृत्वघडणीचा.. आणि या कल्पनेतून ज्ञान प्रबोधिनीची सुरुवात १९६२ साली ‘बुद्धिमंतांसाठी चालणारा एक शैक्षणिक प्रयोग’ या स्वरूपात झाली.

ज्ञानाचे प्रबोधन करणारी, बुद्धिमत्तेस समाजपरिवर्तनाची प्रेरणा देणारी ती ज्ञान प्रबोधिनी!! निवडक विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या शैक्षणिक प्रयोगाने आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर एक मान्यताप्राप्त संघटना म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. प्रत्येकाच्या प्रज्ञेला सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देण्याची ऊर्मी ज्ञान प्रबोधिनी मनात बाळगून आहे. आज हे काम शहरात आणि ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन व आरोग्य, संघटन, स्त्री-शक्ती प्रबोधन आणि राष्ट्रीय एकात्मता अशा विविध क्षेत्रांत चालू आहे.

मुख्य कार्यालय - पुणे
केंद्र - निगडी, सोलापूर, हराळी
उपकेंद्र - साळुंब्रे, शिवापूर, वेल्हे
विस्तार केंद्र - अंबाजोगाई, डोंबिवली


# शिक्षण

शिक्षण चार भिंतींमध्ये आणि क्रमिक अध्ययनाच्या चौकटीत न अडकवता, ते बुद्धीच्या विविध पैलूंना चालना देणारे आणि विद्यार्थ्यांना अधिकाधिक समाजाभिमुख करणारे व्हावे, हे प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोगांचे मुख्य उद्दिष्ट.. त्यासाठी प्रबोधिनीने नेहमीच अनुभवशिक्षणावर भर दिलेला आहे. स्व-विकास आणि समाज-विकास हे एकमेकांच्या हातात हात घालून जाणारे घटक आहेत, यावर भर देऊन, सहाध्याय दिन, ग्रामीण शिबिरे, आपत्तीनंतरचे मदतकार्य, स्वयंअध्ययन तंत्रे, समाजदर्शन कार्यक्रम, सामूहिक गीतांचे गायन, प्रकल्प, अभ्यासाला संकल्पाची जोड देणारे विद्याव्रत, पंचकोशांच्या विकसनावर आधारलेला शैक्षणिक अभ्यासक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवण्यासाठीचे विशेष प्रशिक्षण, असे विद्यार्थ्यांसाठीचे अनेक प्रयोग इथे होत आहेत. शैक्षणिक साहित्य निर्मिती, शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग, स्पर्धा परीक्षांच्या तयारीचे मार्गदर्शन, नेतृत्वविकसनासाठी प्रशिक्षण वर्ग, पूर्व प्राथमिक शाळेत शिकवू इच्छिणाऱ्यांसाठीचे विद्यालय आणि शिक्षणातले असे अनेक उपक्रम सर्वदूर पोहोचवण्यासाठी मासिक, असे शैक्षणिक क्षेत्रातले अन्य वैविध्यपूर्ण प्रयोगही प्रबोधिनी सातत्याने करते आहे.



# संशोधन

नवे आणि जुने याची सांगड घालताना, पारंपरिक पद्धतीने आपल्यापर्यंत आलेल्या ज्ञानाचे संरक्षण, संवर्धन झाले पाहिजे आणि त्यावर अभ्यासपूर्ण भाष्य करून त्या ज्ञानाचा मनुष्यघडणीच्या कामात उपयोग करून घेता आला पाहिजे, यासाठी प्रबोधिनीचा संशोधन प्रभाग कार्यरत आहे. संस्कृत, मानसशास्त्र व प्रसंगानुरूप अन्य सामाजिक शास्त्रांमधील संशोधन प्रबोधिनीने सुरू केले ते या मनुष्यघडणीच्या कामाला संशोधनाची जोड मिळावी म्हणूनच! संस्कार पोथ्यांची पुनर्रचना, पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग, महाराष्ट्रापासून अन्य देशांपर्यंत विविध ठिकाणी होणारे संस्कार कार्यक्रम, अनेक विषयांवरील व्याख्यानमाला, गिल्फर्ड मॉडेल वरील चाचण्या, पूर्व प्राथमिक वयोगटातील बालकांपासून ते विविध औद्योगिक कंपन्यांमधील सदस्यांपर्यंतच्या गटांसाठी विविध प्रशिक्षणे, प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या शिक्षकांसाठी वर्ग, उद्योगांसाठी मार्गदर्शन, समुपदेशन असे अनेक क्षेत्रांमधील संशोधनाचे व त्याच्या उपयोजनाचे काम आज प्रबोधिनीत चालू आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या विविध परिषदांमध्ये प्रबोधिनीचे सदस्य सहभागी होत आहेत. विज्ञान आणि प्रौद्योगिकी मंत्रालय, विश्वविद्यालय अनुदान आयोग, महाराष्ट्र राज्य शिक्षण संचलनालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अशी विविध स्तरांवरची शासनमान्यता प्रबोधिनीच्या संशोधन संस्थेला आहे.



# ग्रामविकसन व आरोग्य

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करत राहणे, हा सुरुवातीपासूनच प्रबोधिनीच्या कामातला महत्त्वाचा भाग आहे. पाणलोट क्षेत्र विकासासाठी माती बंधारे, सिमेंट बंधारे, शेततळी, झरे विकास इत्यादी कामे, डोंगराळ भागातील वाड्या-वस्त्यांमध्ये सौर दिव्यांचा प्रसार, सौर-जैव-पवन ऊर्जेचे विविध प्रयोग, ग्रामीण तरुणांना तांत्रिक प्रशिक्षण, वनवासींच्या उपजीविकेसाठी प्रशिक्षण, ग्रामीण विद्यार्थ्यांना शेतीचे औपचारिक शिक्षण घेता येईल अशा आस्थापना, असे अनेक प्रकारचे काम प्रबोधिनीद्वारे चालू आहे. अशा सर्व कामांसह १९८१ ते २००३ या काळात कुष्ठरोग निर्मूलन योजना, गरोदर महिलांसाठी आरोग्य तपासणी, कुपोषण मुक्तीसाठी बालवाडी तायांचे प्रशिक्षण, निर्धूर चुली व पाण्याच्या फिल्टरच्या वापराचे प्रशिक्षण, प्राथमिक उपचारासाठी आरोग्य प्रबोधिका प्रशिक्षण, सकस आहार योजना, परिचारिका प्रशिक्षण अशी आरोग्य विषयक कामांची जोडही प्रबोधिनीच्या ग्रामीण कामाला आहे. स्वतःच्या वैयक्तिक उन्नतीच्या पलीकडे आपल्या परिसराचाही विकास झाला पाहिजे, अशी प्रेरणा असणाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांना प्रशिक्षण देणे व त्यांच्याद्वारे नमुना कामे उभी करणे, यासाठी प्रबोधिनी प्रयत्नशील आहे.

संघटनवृत्ती वाढवणे म्हणजेच ध्येयासाठी समूहाने एकत्र येऊन काम करणे, हे या देशासमोरील सर्व प्रश्नांसाठीचे उत्तर आहे असे प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा म्हणत.. शिक्षण, संशोधन, व्यापार, उद्योग, शेती, संरक्षण, आरोग्य अशा सर्व क्षेत्रांत प्रसंगानुसार व भविष्याचा वेध घेत कर्तृत्व दाखवण्याची व प्रतिभाशाली नेतृत्व करण्याची प्रेरणा जागृत करणे व त्यासाठी कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हे युवक आणि युवती संघटनाच्या उपक्रमांचे मुख्य उद्दिष्ट आहे. क्रीडा, कला, विज्ञान अशा वैविध्यपूर्ण माध्यमांतून समाजातील अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारे आणि त्या सर्वांना गटात विविध कौशल्ये शिकण्याची संधी देत, त्यांच्यातील समूहभावना वाढवणारे 'दल' हा या संघटनात्मक प्रयोगांचा गाभा.. गटात काम करायला शिकणे, आपल्या आजूबाजूच्या गटांमध्ये आवर्जून मिसळणे, विविध सामाजिक विषयांवर चर्चा-अभ्यास, स्वतःच्या शारीरिक-मानसिक क्षमता ताणायला शिकणे, देशातील विविध संस्थांना, भौगोलिक प्रदेशांना भेटी देऊन आपण सर्व एकाच धाग्यात बांधलेले आहोत याचा अनुभव घेणे, व्यक्तीपेक्षा संघटनेला मोठे मानायला शिकणे, गटाच्या ध्येयावर निष्ठा ठेवायला शिकणे, अशा अनेक अनुभवांमधून गेलेले युवक वा युवती राष्ट्रघडणीच्या कामात अधिक मोलाचे योगदान देऊ शकतात, असा प्रबोधिनीचा आजवरचा अनुभव आहे.

# संघटन



# स्त्री-शक्ती प्रबोधन

सर्वच स्त्रियांमध्ये त्यांचा आत्मसन्मान, त्यांचा समाज-व्यवहारामध्ये सहभाग आणि त्यांच्यामधले राष्ट्रीय चारित्र्य वाढवणे हे महत्त्वाचे, असे प्रबोधिनी मानते. स्त्रियांबाबत केवळ समानतेचा विचार उपयोगी नाही, तर त्यांच्यामधील गुणांचाही विकास व्हायला हवा या विचाराने शहरी आणि ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी विविध बैठकींद्वारे कौशल्य- प्रशिक्षण, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, बचत गटांच्या माध्यमातून त्यांचे एकत्रीकरण, त्यांनी समाजातील अन्य विविध गटांसाठी कार्यक्रम योजणे, ग्रामीण भागातील आरोग्य विषयक प्रबोधनाचे काम, कुटुंब समुपदेशन, अंगणवाडी चालवण्यासाठीचे प्रशिक्षण, स्त्रियांसाठीचे द्वैमासिक असे अनेक प्रकारचे उपक्रम आज चालू आहेत. महिलांच्या व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व विकसनासाठीही विविध कार्यक्रम योजले जातात. शहरी भागांमध्ये देखील पदवीधर गृहिणी एकत्र येऊन शालेय विद्यार्थ्यांसाठी लैंगिकता प्रशिक्षण, विद्याव्रत संस्कार, कुटुंबासाठी समुपदेशन, विविध विषयांवरील देवाणघेवाणीसाठी मासिक बैठकी असे अनेक व्यक्तिमत्त्व विकसनाचे कार्यक्रम नियमितपणे योजतात.





# राष्ट्रीय एकात्मता

प्रबोधिनीच्या दृष्टीने प्रज्ञेस प्रेरणासंपन्न बनवणे हे काम आर्थिक, सामाजिक, धार्मिक किंवा ध्येयविषयक भेदभावांना छेद देऊन जाणारे असे सार्वदेशिक कार्य आहे. समाजाच्या सर्व गटांमध्ये भौतिक विकासाची आणि सांस्कृतिक उन्नतीची कामे प्रबोधिनीला करायची आहेत. तसेच समाजाच्या सर्व गटांमधून नवे स्त्री-पुरुष कार्यकर्ते प्रेरित आणि प्रशिक्षित करायचे आहेत. जे आपल्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत अशा अनेकांपर्यंत आपण स्वतःहून पोहोचले पाहिजे, विविध समाज गटांमधला संवाद-साहचर्य वाढले पाहिजे अशा हेतूने, वैज्ञानिक प्रयोग, शिक्षक प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षांची तयारी, हस्तकौशल्य प्रशिक्षण, मेळावे, महिला व तरुणांसाठी व्यवसाय कौशल्य वर्ग, व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे अशी वैविध्यपूर्ण माध्यमं वापरून आसपासच्या नागरी वस्त्यांपासून ते देशाच्या सीमावर्ती प्रदेशांपर्यंत अनेक ठिकाणी प्रबोधिनी विस्तारते आहे.

# ज्ञान प्रबोधिनी


ज्ञान प्रबोधिनी : ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००, २४४७७६९१
फॅक्स : (०२०) २४४९१८०६
वेबसाईट : www.jnanaprabodhini.org
ई-मेल : contact@jnanaprabodhini.org


## ज्ञान प्रबोधिनीचे सन्मान्य सदस्य

डॉ. रघुनाथ माशेलकर - *माजी महासंचालक, सीएस्आय्आर्, नवी दिल्ली*
श्री. आण्णा हजारे - *सामाजिक कार्यकर्ते*
श्रीमती अनु आगा - *माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या*
डॉ. जयंत नारळीकर - *माजी संचालक, आयुका, पुणे*
श्री. मनोज नरवणे - *माजी चिफ ऑफ आर्मी स्टाफ*

## ज्ञान प्रबोधिनी, पुणे : पदाधिकारी

१. डॉ. रघुनाथ माशेलकर - *अध्यक्ष*
२. डॉ. विजय लक्ष्मण केळकर - *उपाध्यक्ष*
३. डॉ. श. बा./रवि पंडित - *कार्याध्यक्ष*
४. डॉ. गिरीश श्री. बापट - *संचालक*
५. प्रा. महेंद्र सेठिया - *कार्यवाह*
६. श्री. आशुतोष बारमुख - *सहकार्यवाह*
७. श्री. मोहन गुजराथी - *निधिधारक*
८. श्री. सचिन गाडगीळ - *संपदाधिकारी*

## ज्ञान प्रबोधिनी संस्था से संलग्न न्यास

१. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास
३. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
५. ग्राम प्रबोधिनी

## संलग्न सेक्शन ८ कंपन्या

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फौंडेशन (JPPAF)
२. एसीआईसी (ACIC) ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन

## नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय संस्था, यूएस्ए

१. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF)

- ज्ञान प्रबोधिनी, पुणे व सर्व संलग्न न्यासांना मिळालेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.
- ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेला मिळालेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ३५ (i) (iii) खाली करमुक्त आहेत.